न्यूज कॉलम

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ६३ वा ▶ रविवार दि.७ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

### तरुणाला मारहाण; ८ जणांवर गुन्हा

**शिंदखेडा ।** गल्लीत शिवीगाळ का केली, असा जाब विचारत भरत अण्णा पाटील (रा. देगाव ता. शिंदखेडा) यास त्याच्या घरी जावून योगेश माणिक पाटील याच्यासह आठ जणांनी हाताबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच शिवीगाळ करीत जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना २ जानेवारीला रात्री साडेआठच्या सुमारास घडली. याबाबत भरत पाटील याच्या फिर्यादीवरून योगेश पाटीलसह बारके उधा पाटील, संदीप बारकू पाटील, रावसाहेब काशीनाथ पाटील, त्र्यंबक संपत पाटील, बबलू नथा पाटील, संजू रावसाहेब पाटील, सोनू काशीनाथ पाटील (सर्व रा. देगाव) यांच्याविरूद्ध शिंदखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला.

### देवपुरात दोन गट भिडले, गुन्हा दाखल

**धुळे ।** देवपूरातील विष्णु नगराजवळील पितांबर चौकात काल दुपारी दोन गट आमने-सामने आले. दगडफेकरीत एकमेकांना मारहाण करणार्या नऊ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एएसआय सोनवणे करीत आहेत.

### रिक्षाचालकाकडे किमती घरफोडी

**धुळे ।** तालुक्यातील नवडणे येथे चोरट्यांनी रिक्षाचालकाकडे घरफोडी करीत रोकडसह ५५ हजारांचा ऐवज लंपास केला. याबाबत सुनील निंबा बुवा यांनी तक्रार दिली. घराचा कडी कोयंडा तोडून प्रवेश केला. कपाटातील तिजोरीतून२० हजारांची रोकड व ३५ हजारांचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

# मराठी रंगभूमीचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध
## वृद्ध कलावंतांचे मानधन वाढविण्यात येईल : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**पुणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. मराठी रंगभूमीचे प्रश्न्न सोडविण्यासाठी लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल तसेच वृद्ध कलावंतांचे मानधन वाढविण्यात येईल, असे प्रतिपादन यावेळी शिंदे यांनी केले.

मोरया गोसावी क्रीडा संकुल चिंचवड येथील आद्य नाटककार विष्णुदास भावे रंगमंचावर आयोजित या कार्यक्रमाला उद्योगमंत्री तथा नाट्य संमेलनाचे निमंत्रक उदय सामंत, ज्येष्ठ नेते तथा नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष खा.शरद पवार, खासदार श्रीरंग बारणे, ९९ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.जब्बार पटेल, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर आदी उपस्थित होते.

मराठी माणसाच्या नाट्यप्रेमामुळे १०० वर्षे ही गौरवशाली परंपरा लाभली असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले, देशात नाट्य कलेला २ हजार वर्षांची दीर्घ परंपरा लाभली आहे. मराठी रंगभूमीची सुरुवात विष्णुदास भावे यांच्या सीता स्वयंवर नाटकाने झाल्यानंतर मराठी रंगभूमीने अनेक बदल पाहिले आहेत. अनेक थोर कलाकारांच्या योगदानातून मराठी रंगभूमी बहरली.नाटक रसिकांच्या पसंतीस उतरण्यासाठी आशय, विषय, सादरीकरण, नेपथ्य, संगीत याची चाकोरी मोडण्याची गरज असते, मराठी रंगभूमीने ते केल्याने या रंगभूमीचा उत्कर्ष होत आहे. आज समाजमाध्यमांच्या काळातही प्रेक्षक नाटकांना गर्दी करतात. व्यावसायिक सोबत प्रायोगिक रंगभूमीलाही चोखंदळ प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. हजारो कलाकार आणि पडद्यामागील कलावंतांनी यासाठी योगदान दिले आहे. गेल्या १०० वर्षात सुवर्णकाळ अनुभवताना अनेक अडचणींवर मात करीत रंगभूमी पुढे जात आहे. म्हणूनच या रंगभूमीचा आनंद सोहळा दिमाखात साजरा होत आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.






### नाट्यसृष्टीच्या उत्कर्षासाठी एकत्रित प्रयत्न : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मराठी रंगभूमीच्या विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे नमूद करून शिंदे म्हणाले, १०० वे नाट्य संमेलन असल्याने नाट्य संमेलनासाठी ९ कोटी ८३ लाख आणि मुंबई येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी १० कोटींचा निधी देण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाकडून नवी नाट्यगृहे उभारण्यात येणार आहेत मात्र हे करतांना नाट्य कलावंतांच्या मागणीनुसार जुन्या नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येईल. मराठी नाट्य परिषदेसाठी मुंबईत भूखंड देण्याबाबत सहकार्य करण्यात येईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नाट्यगृहात पूर्वीप्रमाणे विजेचा खर्च आकारला जाईल. ज्येष्ठ कलावंतांच्या घराबाबतही शासन सकारात्मक आहे. नाट्यसृष्टीच्या उत्कर्षासाठी एकत्रित प्रयत्न करताना मराठी रंगभूमीसाठी शासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

### मराठी नाटकाने मनोरंजन आणि प्रबोधनाचे कार्य केले - रा. काँ. अध्यक्ष खा. शरद पवार

चिंचवडच्या पावन भूमीत नाट्य संमेलन होत असल्याबाबत आनंद व्यक्त करून ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार म्हणाले की, सर्व कलांचा संगम असलेली रंगभूमी सर्वाधिक परिणामकारक माध्यम आहे. नाट्याचा मुख्य उद्देश मनोरंजन असल्याचे भरतमुनी यांनी म्हटले आहे, मात्र नाटकाच्या माध्यमातून प्रबोधन आणि ज्ञानदानाचे कार्य उत्तमरीतीने होते. रंगभूमीच्या माध्यमातून अनेक वर्षे लोकप्रबोधनाचे कार्य होत आहे. मराठी नाट्यसृष्टीद्वारे नवे विषय मांडले जात आहेत. नाट्य रसिकांना नाटकांकडे आकर्षित करणारी नाटके रंगभूमीवर यावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नाट्य संमेलनाच्या निमित्ताने राज्याच्या विविध भागात कार्यक्रमांचे आयोजन होणार असल्याने नाट्यरसिकांना ही मोठी पर्वणी आहे, असेही पवार म्हणाले.



### नाटय संमेलन कलाकरांसाठी दिवाळी : प्रशांत दामले

कलाकरांसाठी नाटय संमेलन ही दिवाळी आहे. प्रत्येक कलाकार कुठे ना कुठे काम करत असतो परंतु नाटय संमेलन माध्यमातून एकमेकांना जाणून घेता येते किंवा भेटता येते. नवीन विचार निर्माण करण्यासाठी ही एक हक्काची जागा आहे. २२ ठिकाणी नाटय जागर घेण्यात येत आहे. कोरोना काळानंतर मुंबईतील तीन नाटयगृहाचे भाडे कमी करुन देण्याची मागणी मुख्यमंत्री यांना केली त्यानुसार त्यांनी तातडीने काम केले. त्यानंतर राज्यभरात नाटयगृहाचे भाडे कमी करुन घेतले. नाटयगृहाचे भाडे सर्व ठिकाणी अडीच ते तीन हजार असते परंतु पिंपरीतील रामकृष्ण नाटयगृहाचे भाडे १४ हजार आहे ते मुख्यमंत्र्यांनी कमी करावे.

### कलाकारांच्या वृद्धाश्रमासाठी शासनाने निधी द्यावा : उद्योगमंत्री सामंत

उद्योगमंत्री सामंत म्हणाले की, पिंपरी चिंचवड येथे नाट्य संमेलनाचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या नाट्य संमेलनानंतर कलाकार आणि पडद्यामागील कलावंतांचे प्रश्न्न सोडविण्यासाठी बैठकीचे आयोजन व्हावे आणि ज्येष्ठ कलाकारांच्या वृद्धाश्रमासाठी शासनाने निधी द्यावा,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शासनातर्फे नाट्य संमेलनासाठी प्राप्त निधीचा उपयोग कलाकार आणि पडद्यामागील कलावंतांना मानधन आणि आरोग्य विमा काढण्यासाठी करण्यात येईल, असेही सामंत म्हणाले.

### नाट्य प्रशिक्षणाद्वारे रंगभूमीचा विकास : जब्बार पटेल

नाट्य संमेलनाध्यक्ष जब्बार पटेल म्हणाले की, मराठी रंगभूमी प्रगल्भ आणि विविधतेने नटलेली आहे. नाट्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून रंगभूमीचा अधिक विकास होईल. देशपातळीवरील उत्तम कलाकारांच्या माध्यमातून विद्यापीठातून नाट्यकलेचे प्रशिक्षण आणि संशोधन व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## लेखणीचा वापर पत्रकारांनी सजगपणे करावा : एपीआय काळे

### समाजस्वास्थ्यासाठी पत्रकार, पोलीस महत्वाचे : सूर्यवंशी

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

पत्रकार हा पोलिस दलासाठी अत्यंत महत्वाचा घटक आहे. पोलिस आणि पत्रकार या दोघांनाही समाज मान्यता आहे. त्यामुळे लेखणीच्या माध्यमातून कोणी दुखावले जाणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. म्हणूनच पत्रकारांनी लेखणीचा वापर सजगपणे करावा अशी अपेक्षा अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे यांनी व्यक्त केली. पत्रकार संघाच्या सभागृहात पोलिस पत्रकार संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रास्ताविक करताना पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे म्हणाले की, पत्रकारितेच्या ताकदीच्या बळावर माझ्यासारखा एक मिल कामगाराचा मुलगा इथपर्यंत पोहचू शकतो. पत्रकारीतेच्या माध्यमातून समाज घटकांना न्याय देण्याची भुमीका असल्याने ज्येष्ठ पत्रकारांच्या सहकार्यामुळे मी अध्यक्षपदापर्यंत पोहचू शकलो. असे सांगितले. त्यानंतर आ.फारुक शाह योगेंद्र जुनागडे, बापू ठाकुर, दिलीप विभांडीक, धुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे, भाजपाच्या नेत्या जयश्री अहिरराव, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मिलिंद बैसाणे, रविंद्र इंगळे, सुनिल पाटील, नुरभाई पठाण, विशाल ठाकुर,तुषार बाफना, आप्पा खताळ, विजय अग्रवाल,धनश्री आणि प्रितम सूर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार अनिल चव्हाण, अमोल पाटील, निलेश भंडारी, गोपाल राजपुत, जीवन शेंडगे, गोपाल कापडणीस, देवेंद्र पाठक, अशोक तोटे, कमर शेख, भाऊसाहेब माळी, पुरुषोत्तम गरुड, अजिंक्य देवरे, आकाश सोनवणे, प्रकाश शिरसाठ, धनंजय गाळणकर,दीपक शिंदे, मधुकर मिस्तरी, चेतन पंडीत, गोरख गर्दे, रोहित गर्दे, सुभाष वाघ, मनोहर सोलंकी,आवेश पठाण, श्रीकृष्ण बेडसे, जमील शाह, मोहन मोरे, प्रदीप मिस्तरी,पुरुषोत्तम पाटील यांच्यासह उपस्थित पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



## प्रेस क्लब संस्कृतीच्या युगात पत्रकार संघ टिकून: खा. राऊत

### पत्रकारदिनी पत्रकार भवनात दर्पणकारांच्या प्रतिमेचे पूजन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

प्रेस क्लबच्या अत्याधुनिक युगातही मुद्रित माध्यमे व इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे पत्रकार संघ टिकवून ठेवत त्याचा कारभार उत्तम प्रकारे चालवीत असल्याचे पाहून खूप समाधान व अभिमान वाटत असल्याची भावना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक, खा.संजय राऊत यांनी व्यक्त केली. खा. राऊत हे धुळे दौऱ्यावर आले असता त्यांनी पत्रकार दिनाचे औचित्य साधून आपल्या नियोजित कार्यक्रमांमधून वेळ काढत धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनास भेट दिली.

पत्रकार भवनाचे रुपडे पाहून खा. राऊत चांगलेच भारावले. पत्रकार भवनातील मौल्यवान, दुर्मिळ ग्रंथसंपदा पाहून राऊत यांनी समाधान व्यक्त केले. यातील अनेक पुस्तकांच्या लेखकांशी माझा वेळोवेळी प्रत्यक्ष संबंध आला आहे. त्यातील काही लेखक माझे चांगले मित्र असल्याचे खा. राऊत यांनी नमूद केले. मी सर्वात अगोदर एक पत्रकार आहे. याची रोजच जाणीव ठेवतो. माझ्यासोबत नेहमी कोरे कागद व पेन बाळगतो. दररोज लिखाणाची सवय यातूनच माझी पत्रकारिता मोठी झाली आहे. मी दैनिक सामनाला सर्वात आधी प्राधान्य देतो. पत्रकारितेच्या विश्वात प्रिंट मीडियाचे महत्व कधीच कमी होणार नाही असा ठाम विश्वास खा. राऊत यांनी व्यक्त केला. संघातर्फे खा. राऊत यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, नुरखान पठाण, विद्यमान अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, सचिव सचिन बागुल, कोषाध्यक्ष तुषार बाफना, प्रांतिक प्रतिनिधी प्रकाश शिरसाठ, पुरुषोत्तम पाटील, आकाश सोनवणे, दीपक पाटील, पंकज पाटील, अजिंक्य देवरे, पुरुषोत्तम गरुड उपस्थित होते.




## नाशिक उपकेंद्राच्या लढ्याला अखेर यश; पेढे वाटून आनंदोत्सव साजरा

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठतर्फे नाशिक उपकेंद्राला मिळणाऱ्या सापत्न वागणुकीचा निषेध म्हणून उभारलेल्या सर्वपक्षीय व सर्व संघटनांच्या लढ्याला अखेर यश मिळाले असून त्यानिमित्त पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य सागर वैद्य यांनी केलेल्या पाठपुराव्याबद्दल त्यांना पेढे भरुन उपकेंद्राच्या कार्यालयात जल्लोष साजरा करण्यात आला.



याप्रसंगी विद्यार्थी युवा नेते ड. अजिंक्य गिते, आरपीआय युवक महानगर प्रमूख ड. प्रशांत जाधव, शिवसेना विद्यार्थी सेनेचे शुभम पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यासागर घुगे, प्रदेश सचिव रमीज पठाण, उद्धव ठाकरे गटाचे प्रविण चव्हाण, काँग्रेसचे दर्शन पाटील, मनसेचे शाहबाझ काझी, अजिंक्य निकाळे, सामाजिक कार्यकर्ते संदीप पवार आणि समाधान ठोके आदी उपस्थित होते.

## ज्येष्ठांच्या आशीर्वादामुळेच विकास रथ पुढे नेऊ शकलो : आ.फारुख शाह

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना अंतर्गत प्रभाग क्र.१९ मधील सर्व्हे क्र.४०४ (सिराजुल उलूम मदरसा) येथील मोकळ्या जागेस कुंपण भिंत बांधणे या कामासाठी १ कोटी खर्चाच्या कामाचा शुभारंभ मौलाना मुक्तार अहमद मदनी यांचे शुभहस्ते संपन्न झाला.



आ.फारुख शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास मौलाना हाफिज हिफजुर रहेमान, मौलवी शकील, मौलाना शोएब मौलाना अब्दुल्ला, मौलाना जिया उर रहमान, मौलाना अन्वर उल हक, मौलाना अब्दुला, मौलाना अखलाक, मौलाना हेलाल, मुफ्ती झिया उर, मौलाना रिजवान,मौलाना इर्शाद,मौलाना जमालुद्दिन, मौलाना मोहम्मद आरिफ, हाफिज एयाज अहमद, कारी काशीद अली, सलीम शाह, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग, नगरसेवक मुकतार अन्सारी, नगरसेवक आमिर पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

## मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळणार नाही म्हणजे नाही: छगन भुजबळ

**पंढरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

पंढरपुरात ओबीसी एल्गार मेळावा पार पडला. यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी पुन्हा एकदा मनोज जरांगे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. संपूर्ण मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळणार नाही म्हणजे नाही, असा इशारा देत जरांगेंना थेट आव्हान दिले. तर मतांसाठी तुम्ही ऐकत असाल तर ओबीसींचे देखील मतदान आहे, याचे भान ठेवा, असा इशारा देत भुजबळांनी शिंदे-फडणवीस सरकारला घरचा आहेर दिला.

भुजबळ म्हणाले की, आपले पूर्वज लढवय्ये होते, अन्याय करणाऱ्यांविरोधात आता बोललंच पाहिजे, आपण कोणावरही अन्याय करायचा नाही. आणि कोणावर अन्याय झाला तर त्यांना संरक्षण देण्यासाठी ओबीसी म्हणून उभे राहायचे आहे. आज मी पंढरपुरात आहे. आल्यावर सर्वप्रथम पांडुरंगांचे दर्शन घेतले आहे. पांडुरंग सर्व धर्माचा आहे, सर्व जातीचा आहे. संत महतांनी काय सांगितले आपण सर्व एक आहोत. देव जसा तुमचा आहे. तसा तुमचा आहे. सर्वच पक्षाचे नेते, लोक देवापुढे नतमस्तक होतात. पण नेमकं आरक्षणाच्या वेळीच का अडवले जाते. जे असे कोणी करत असतील त्यांना माझे सांगणे आहे की, तुम्ही अडवू नका.मराठा समाजाला आरक्षण द्या, पण स्वतंत्र द्या. पण जरागेंचं मात्र आम्हाला ओबीसीतूनच आरक्षण मिळाले पाहिजे, अशी मागणी केली जाते. पण लक्षात ठेवा, ओबीसीतून संपूर्ण मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही म्हणजे नाही, असा इशाराच छगन भुजबळ यांनी दिला. दलित, आदिवासी इतर समाजातील लोक देखील ओबीसी समाजासोबत आहे. मतांसाठी तुम्ही भाषण करत असाल तर याद राखा. ओबीसींचे देखील मत आहेत, हे देखील लक्षात घेतलं पाहिजे, असा घरचा आहेर मंत्री छगन भुजबळ यांनी दिला. छगन भुजबळ म्हणाले की, ऑफिसमधून बसून कुणबी लिहायचं आणि ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे काम सुरु आहे. खोटी प्रमाणपत्र देण्याचे काम सुरू आहे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासमोरच मी नेहमीच बोलतोय. मीडियातून देखील सातत्याने सांगत आहे. एल्गार मेळाव्यातून देखील सांगतो आहे.

### २०० गाड्या घेऊन यांची लेकरं मुंबईत



**यांची गरीब लेकरंबाळ मुंबईला जाणार? अन् यांची लेकरंबाळ दोनशे गाड्या घेऊन मुंबईत मैदान पाहायला जातात. अन् हे गरीब आहेत. श्रीमंती आणि गरीबीवर आरक्षण मिळत नाही. हे लक्षात घेतलं पाहिजे. सामाजिक दृष्टीने त्याकडे पाहणार आहात की नाही? जाळपोळ करणारे चूक आहे. गुन्हे मागे घेण्यासाठी दबाव टाकणे चूक आहे. ओबीसीतून आरक्षण मागणे देखील चूक आहे. सरसकट कुणबी प्रमाणपत्र मागणी करून ओबीसींच्या ताटातील ओढून घेणे चूकीचे आहे. हे सर्व जाऊन सांगा त्या मनोज जरांगेंना. छगन भुजबळ हा मराठ्यांच्या विरोधात नाही. जाळपोळ करणाऱ्यांविरोधात आहोत. घडवणारे आहोत. तोडफोड करणारे नाहीत.**

## सरपंचाच्या खुनाचा प्रयत्न; ग्रामरोजगार सेवकावर गुन्हा दाखल

**शिरपूर। लक्ष महाराष्ट्र वृत्त**

जैतपूर (ता. शिरपूर) येथील सरपंचावर खुनीहल्ला करून जीव घेण्याचा प्रयत्न केल्याच्या संशयावरून तेथील ग्रामरोजगार सेवकाविरोधात थाळनेर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

सरपंच भोजेसिंह अमृतसिंह राजपूत (वय ६५, रा. जैतपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते शाळेच्या परिसरात सुरू असलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी गेले असता, संशयित ग्रामरोजगारसेवक पितांबर अर्जुन घोडसे (वय ४६) याने त्यांना तलवारीने पोटावर व हातावर मारून जखमी केले. ग्रामपंचायत ठरावात मंजूर झालेले काम चालू असताना ते बंद करण्यास, तसेच सरपंचपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला, या कारणावरून हा हल्ला केल्याचे राजपूत यांनी फिर्यादीत म्हटले आहे. संशयिताविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. उपनिरीक्षक दिलीप पवार तपास करीत आहेत. संबंधित घटनेच्या निषेधार्थ सरपंच सेवा महासंघातर्फे उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

## महानंदही गमावणार?

२००५ मध्ये महानंदचे रोजचे दूध संकलन ८ लाख लीटर होते. ते अलीकडे २५-३० हजार लीटरवर आले. तोटाही वाढल्याने दैनंदिन खर्च भागवण्यासाठी ओव्हर ड्राफ्ट घ्यावा लागत आहे.

महाराष्ट्रातील सहकारी दूध उत्पादक संघाची शिखर संस्था असलेली महानंद गुजरातमधील राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाकडे हस्तांतरित करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. महाराष्ट्रात येऊ घातलेले आणि अस्तित्वात असलेले प्रकल्प गुजरातमध्ये पळवले जात असल्याचे आरोप महाविकास आघाडीकडून सातत्याने होत असताना आता महानंदच्या हस्तांतरावरून सत्ताधीश आणि विरोधक यांच्यात वाद सुरू झाला आहे. महानंदच्या संचालक मंडळाने या संबंधीचा ठराव केला आहे, सरकारही बहुधा त्यासाठी अनुकूल आहे. त्यामुळे महानंद एनडीडीबी अर्थात राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाच्या अखत्यारीत जाणार हे जवळपास ठरल्यासारखे आहे. यामुळे 'अमूल'च्या उत्पादनाला राज्यात बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. किंबहुना त्यासाठीच हा हस्तांतराचा घाट घातला जात असल्याचा विरोधकांचा आरोप आहे. अखिल भारतीय विकास महासभेचे सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी यावर गुजरातसाठी पायघड्या घालण्याच्या या हालचाली असल्याचे म्हटले आहे. महानंदला ऊर्जितावस्था यावी, तोट्यातून ही संस्था बाहेर पडावी या दृष्टीने राज्य सरकारने प्रयत्न करण्याची आवश्यकता असताना हा प्रकल्पच एनडीडीबीकडे सोपविणे योग्य नाही. गेल्या वर्षी अंदाजपत्रकी अधिवेशनात पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महानंदचे एनडीडीबीत विलीनीकरण केले जाईल, अशी घोषणा केली होती. शिंदे सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनीही आपल्याला हे विलीनीकरण मान्य नसल्याची प्रतिक्रिया दिली होती. सरकार आणि महानंद यांनी मिळून राज्यातील दूध उत्पादकांच्या हिताची जपणूक करणे अपेक्षित असताना राज्य सरकार तटस्थ भूमिका घेऊन राज्यातील महत्त्वाचे प्रकल्प गुजरातच्या घशात घालत आहे, असे दिसते. दोन दिवसांपूर्वीच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले येथील होणारा पाणबुडी पर्यटन प्रकल्प गुजरातमधील द्वारका येथे होणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते, त्यावरून विरोधकांनी राज्य सरकारला आक्रमकरीत्या घेरले होते.

महानंदा तोट्यात का?

दूधउत्पादक शेतकर्यांच्या हितासाठी आणि त्यांच्या आर्थिक समृद्धीसाठी राज्यातील सर्व दूध उत्पादक संस्थांची शिखर संस्था म्हणून 'महानंद'ची स्थापना १९६७ मध्ये झाली. १९८३ पासून महानंद या ब्रँडने दूध विक्री सुरू झाली. सुरुवातीच्या काळात या प्रकल्पाची भरभराट झाली, मात्र नंतर त्यास उतरती कळा लागली. काही लाखांत दररोज होणारे दूध वितरण अवघ्या सत्तर हजार लीटरवर आले. महानंदला दूध पुरवण्याऐवजी इतर ब्रँडला दूधउत्पादक दूध पुरवू लागल्याने आर्थिक व्यवहारावर त्याचा मोठा परिणाम झाला. कर्मचार्यांचे पगार करण्यातही दिरंगाई होऊ लागली, दुधाच्या पिशव्यांसाठी लागणार्या पॉलिथिन पेपर पुरवठादारांचीही देणी थकली. रोजचा खर्च भागवणेही अशक्य झाल्याने महानंदच्या संचालक मंडळाने गेल्या २८ तारखेला महानंद एनडीडीबीकडे सोपवण्याचा ठराव केला. महानंदचे हस्तांतर झाले तरी महानंद ब्रँड कायम राहणार आहे. केवळ त्याचे हस्तांतर करून व्यवस्थापन एनडीडीबीकडे सोपवले जाणार असल्याचे सांगण्यात येते. मात्र यात महानंदच्या कर्मचार्यांचा प्रश्न निर्माण होणार आहे. नऊशेच्या आसपास असलेल्या कर्मचार्यांपैकी केवळ साडेचारशे कर्मचार्यांच्या नोकर्या यात वाचणार आहेत. काहींनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली आहे. त्यांची सुमारे १३० कोटींची देणी कोणी द्यायची याचा वाद आहे. राज्य सरकार आणि राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ यांच्यात त्याबद्दल स्पष्टता नाही. दूधउत्पादक शेतकर्यांच्या हितासाठी स्थापन झालेली ही संस्था अनागोंदी कारभार, जिल्हा दूध संघांचा असहकार, भ्रष्टाचार आणि राज्य सरकारचे दुर्लक्ष यामुळे डबघाईला आली. सरकारी महामंडळाच्या कारभारासारखीच महानंदची गत झाली आहे. प्रक्रियेसाठी दूध मिळत नाही, यंत्रसामुग्री गंजत आहे, मग अशा संस्था केवळ नावापुरती चालवण्यात तरी काय अर्थ आहे?

## नाशिक महानगरीच्या मागील दोनशे वर्षातील शैक्षणिक प्रगती पूर्वार्ध (१८२६ ते १९२६)

नाशिक शहरात सर्वात पहिली प्राथमिक शाळा १८२६ साली सुरू झाल्याची नोंद आहे. नाशिक जिल्ह्यातील गोखले एज्युकेशन सोसायटीचे हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेज १९२४-२५ साली सुरू झाले .त्याला यावर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत.

ब्रिटिशांचे साम्राज्य अठराशे अठरा मध्ये प्रस्तावित झाल्यानंतर पन्नास वर्षात ब्रिटिशांच्या राजकारणाचा, विचारसरणीचा, त्याचप्रमाणे शिक्षण पद्धतीचा पगडा सामान्य जनतेवर बसला व त्यावेळची प्रचलित शिक्षण पद्धती जी शतकानुशतके चालत आली होती, ब्रिटिश राज्यरचनेला निकामी वाटू लागली व नवीन पद्धतीच्या शिक्षण देणाऱ्या शाळांची स्थापना होऊ लागली.

ब्रिटिशांचे राज्य येण्याआधी संपूर्ण राज्यभर पण पंतोजींच्या शाळा होत्या. शिक्षणात अंकगणित ,मोडी व बाळबोध लिहिणे व वाचणे यांचा समावेश होता. त्या काळात साक्षरतेचे प्रमाणे बरेच होते .शेतकरी वर्ग व्यवहारातील आकडेमोड, मोडी व बाळबोध लिहिण्या वाचण्यात तरबेज होता. त्या वेळेच्या गव्हर्नर्स कौन्सिलमध्ये मि. प्रेंडरगास्ट यांनी १८२१ झाली आपल्या भाषणात म्हटले की प्रांतात असे एकही खेडेगाव नाही की ज्या ठिकाणी एकही शाळा नाही. लहानशा गावातील कमीत कमी एक शाळा आहे आणि मोठ्या गावात एकापेक्षा जास्त शाळेत लिहिणे ,वाचणे ,गणित शिकवले जाते. असा एकही शेतकरी नाही जो स्वतः चा जमा खर्च काटेकोरपणे ठेवू शकत नाही. मला असे वाटते की आपल्या देशांतही अशी परिस्थिती सापडणार नाही. त्यावेळेस शिक्षक व्यवहारिक दृष्ट्या प्रशिक्षित नसत. शाळांना इमारती नव्हत्या. या शाळा देवळात, एखाद्या श्रीमंत माणसाच्या घरात किंवा शिक्षकाच्या घरात भरत असत. नियमित अभ्यासक्रम नव्हता. वर्ग नव्हते. क्रमिक पुस्तके नव्हती .विद्यार्थ्यांना आपल्या आवडीप्रमाणे शिकवले जाई. शिकावसे वाटे तोपर्यंत शिकलले जाई. लिहता वाजता यायला लागल्यावर शेतकऱ्यांचा मुलगा शाळा सोडून दिली. व्यापाराच्या मुलाला हिशोब येऊ लागला की घरी ठेवून घेण्यात येई. ब्राह्मणाचा मुलगा त्याच्या पुढे जाऊन शिके. शिक्षकांच्या लायकीप्रमाणे अभ्यासक्रम बदली. लोकांच्या गरजेनुसार शाळेचे विषय बदलत. परंतु लिहिणे, वाचणे व गणित हे शिकवली जातच. शिक्षकांना धान्य अथवा कपडा व काही प्रसंगी पैसे मिळत पण त्याला योग्य तो मान मिळत असे. ब्रिटिशांना ही शिक्षण पद्धती अतिशय अकार्यक्षम व निरोपयोगी वाटली व १८४० साली प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमात मोडी, बाळबोध लिहिणे ,वाचणे, अंकगणित, बीजगणित ,भूमिती, त्रिमिती खगोलशास्त्र ,भूगोल, निसर्गविज्ञान, इंग्लंडचा व हिंदुस्तानाचा इतिहास या शिवाय ज्यांना सरकारी नोकरी करायचे त्यांना महसुली कायदे, दिवाणी व फौजदारी कायदे यांचा या अभ्यास करावा लागत असे. नवीन अभ्यासक्रम सहा ते दहा वर्षाचा होता. एकच शिक्षक वरील सर्व विषय शिकवत असे. सरकारी शिक्षण खात्यात वरील प्रकारच्या शाळा सुरू केल्या तरी खेडेगावातील नवीन प्राथमिक शाळा लोकविरोधामुळे स्थापन होऊ शकल्या नाहीत. मात्र शहरात त्यांची संख्या वाढू लागली.

नाशिक शहरात पहिली प्राथमिक शाळा १८२६ साली स्थापन झाली. दुसरी पंचवटीची शाळा १८६५ साली स्थापन झाली . प्राथमिक शाळा नंबर दोन १८६३ साली स्थापन झाली. सुरुवातीला या सर्व शाळा त्या वेळच्या लोकल बोर्डातर्फे चालवल्या जात. १८६४ झाली नाशिकला नगरपालिकेची स्थापना झाली व १८८३ -८४ पासून सर्व नाशिक शहरातील प्राथमिक शाळा नगरपालीकेकडे सोपवण्यात आल्या व त्याला सरकारी ग्रांट ठरवून दिली. सुरुवातीला एक तृतीयांश रक्कम सरकारने नगरपालिका द्यायची ठरले. व बाकीचा खर्च नगरपालिकेने करायचा ठरला. १८८० पर्यंत नाशिक शहरातील सरकारी शाळांची संख्या नऊ झाली होती. १८८०-१८९० या दशकात प्रथमच विद्यार्थी संख्या हजाराच्या वरती गेली .१८९४ सालच्या नोंदीनुसार विद्यार्थी संख्या १४१४ होती.

१९२६ पर्यंत नगरपालिकेचे शाळांची संख्या ११ होत्या. परंतु नगरपालिकेत दत्तरी शाळांची संख्या २२ आहे. त्यामुळे शाळा दुबार भरत असाव्यात, असे अनुमान काढता येते. नगरपालिकेच्या व्यतिरिक्त आणि खाजगी संस्था तर्फे चालवल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांची माहिती देणे येथे उपयुक्त ठरेल. आधी सांगितल्याप्रमाणे अठराव्या शतकाच्या सुरुवातीच्या पूर्वार्धात पंतोजींच्या शाळा सुरू होत्या. परंतु सरकारी शिक्षण खात्याने नवीन प्राथमिक शाळा सुरू केल्यानंतर खाजगी संस्थांनी विशेषता मिशनरांनी प्राथमिक शिक्षणाच्या शाळा व नवीन अभ्यासक्रमांच्या शाळा सुरू केल्या.

१८८४ मध्ये नाशिकच्या चर्च मिशन व आयएफएन या दोन अनुदानित शाळा होत्या. १८९३ -९४ साली झोरिस्ट्रियन मिशन मार्फत बुधवार पेठेत व रविवार पेठेत मुला-मुलींची शाळा चालवल्या जात होत्या.

१८९९ - १९०० पुढील शाळा होत्या. १.चर्च मिशन मुलांची शरणपूर शाळा, २.झोरेस्ट्रियन मुला मुलांची बुधवार पेठेतील शाळा ३. झोरेस्ट्रियन मुला मुलींची रविवार पेठेतली शाळा व ४. संस्कृत शाळा.

यानंतर मात्र सरकारी शाळांपेक्षा खाजगी शाळा वाढायला लागल्या. १८६१ पूर्वी नाशिक मध्ये माध्यमिक शाळा नव्हती. नासिक हायस्कूल हे १८६१ मध्ये सुपीरियर अँग्लो व्हनर्याक्युलर स्कूल या नावाने सुरू करण्यात आले व १८७१ मध्ये त्याचे नाव नाशिक हायस्कूल असे झाले. याच हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री द्वारकानाथ राघोजी तरखडकर यांनी इंग्रजी भाषांतर पाठमालेची प्रसिद्ध तीन पुस्तके लिहिली आहेत. नाशिक नगरपालिका उर्दू शाळा १८८३ मध्ये सुरू झाली.

सर मिशन स्कूल- मिडल स्कूल शरणपूर हे १८८३ मध्ये सुरू करण्यात झाले. चर्च मिशनचे सेंट जॉर्ज हायस्कूल म्हणजेच पेठे हायस्कूल १८१३ -१४ मध्ये सुरू झाले. परंतु २२-२३ ला ही शाळा बंद पडली व एक वर्षाच्या अवधीनंतर १९२३-२४ साली नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या नेतृत्वाखाली हे हायस्कूल परत सुरु करण्यात आले. १९४३ साली मुंबईतले दानशूर पेठे बंधूंनी हायस्कूल ला उदार देणगी दिली व सेंड जॉर्ज हायस्कूलचे पेठे हायस्कूलचे असे नामकरण करण्यात आले.



शब्द संवाद
प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

१९१२ साली झोरेस्ट्रीयन मिशन स्कूल- व्हीक्टोरिया गर्ल्स स्कूल नाशिक सुरू करण्यात आले ते १९२४ मध्ये बंद झाले.

नाशिक होम स्कूल ही मुलींसाठी शाळा १९१३ ला सुरू झाली व १९२४ झाली ही शाळा खंडाळ्याला हलवण्यात आली .

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ - न्यू इंग्लिश स्कूल- रुंगटा हायस्कूल नाशिक

ही शाळा १९१८ साली श्री शंकर कर्डिले यांच्या वाड्यात न्यू इंग्लिश स्कूल या नावाने माध्यमिक शाळा सुरू केली .सन २३-२४ शहरातील सगळ्यात मोठी शाळा झाली. न्यू इंग्लिश स्कूलचे नामकरण रुंगटा हायस्कूल असे १९४३ साली करण्यात आले. सरकारी कन्या शाळा १९२० साली -गव्हर्नमेंट ब्रांच ए व्ही गर्ल्स हायस्कूल सुरू झाले . पारशी बोर्डिंग स्कूलचे बॉईज टाऊन शाळा १९२३-२४ ला सुरू करण्यात आले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह १९१४ साली सुरू करण्यात आले. व पुढील शंभर वर्षांत संस्थेचे महाकाय वृक्षात रूपांतर झाले.

महाविद्यालयीन शिक्षण

नाशिक मध्ये प्राथमिक शिक्षण सुरू झाल्यानंतर म्हणजे १८२६ नंतर, नाशिक मध्ये पहिले महाविद्यालय निघायला १०० वर्षे लागली .गोखले एज्युकेशन सोसायटीने १९२४ -२५ साली नाशिक येथे हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेज सुरू केले व १९२८- २९ आली मुंबई विद्यापीठाच्या पदवी परीक्षेला ते विद्यार्थी बसले. २४ -२५ ला विद्यार्थी संख्या ९५ होती.

गेल्या दोन शतकातील व त्या पूर्वकालातील शिक्षणाची वाटचाल अभ्यासल्यानंतर भारताच्या-महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरातील शैक्षणिक प्रगती समाधानकारक होती असेच म्हणावे लागेल. ब्रिटिश साम्राज्याच्या प्रारंभीच्या पूर्वपरंपरागत प्राथमिक शाळा 'त्यानंतरच्या काळातील पाश्चिमात्य शास्त्राच्या व ज्ञानाच्या त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेचा लोकमतांवरचा पगडा, राज्यकर्त्याच्या सहाय्यार्थ ठरलेले मिशनरींचे शैक्षणिक कार्य, राष्ट्रीय शिक्षणाचा उगम आणि विकास, राष्ट्रीय मनोवृत्तीने स्थापन झालेल्या व आजवर कार्य करत असलेल्या शैक्षणिक संस्था या घटना सामाजिक, राजकीय ,शैक्षणिक मनोभूमिकेचे स्थित्यंतरे दर्शवतात.

१८२६ ते १९२६ म्हणजे पहिली शंभर वर्ष नाशिक मधील शिक्षणाचा प्रसार- पहिली ५० वर्षे प्राथमिक शिक्षण, १८६३ पासून माध्यमिक शिक्षणाची सुरुवात व माध्यमिक शिक्षणाचा प्रसार व पहिल्या शतकाच्या शेवटी महाविद्यालयीन शिक्षणाला सुरुवात असा झाला. आपण लेखाच्या उत्तरार्धात १९२४ ते २०२४ या दुसऱ्या शतकातील नाशिक जिल्ह्यातील शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेऊ.

## आयात शुल्कातील कपातीमुळे फोडणी स्वस्त

महागाईच्या आघाडीवर सर्वसामान्य माणूस मेटाकुटीला आला आहे. खाद्य तेलाच्या किंमती आटोक्यात आणण्यासाठी केंद्र सरकारने यापूर्वीच पावले उचलली होती. त्यामुळे या वर्षात खाद्य तेलाने ग्राहकांचा खिसा कापला नाही. केंद्र सरकारने यापूर्वीच आयात शुल्क कपात केले होते. आता नवीन निर्णयानुसार, आयात शुल्कातील ही कपात मार्च २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. ही मुदत मार्च २०२४ मध्ये ही मुदत संपणार होती. या निर्णयामुळे नागरिकांना आता पुढील १५ महिन्यापर्यंत स्वस्त खाद्यतेल मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


केंद्रीय अर्थ मंत्रालयाने याविषयीची माहिती दिली आहे. त्यानुसार, रिफाइन्ड सोयबीन तेल आणि रिफाइन्ड सूर्यफुल तेलावरील आयात शुल्क १७.५ टक्क्यांहून कमी होऊन १२.५ टक्क्यांवर आणण्यात आले आहे. दरातील ही कपात मार्च २०२५ पर्यंत लागू असेल. आयात शुल्क कमी झाल्याने हे तेल देशात येण्याचा खर्च कमी होईल. सर्वाधिक खाद्यतेलाचा वापर करणारा भारत जगातील दुसर्या



क्रमांकाचा देश आहे. खाद्यतेलाच्या आयातीत जगात भारत पहिल्या क्रमांकावर आहे. देशाच्या एकूण गरजेच्या साठ टक्के वाटा आयात तेलाचा आहे. इंडोनेशिया आणि मलेशियामधून पाम तेल आयात करण्यात येते. सोयाबीन, मोहरी आणि सूर्यफुल यांच्या तेलाचा भारतात सर्वाधिक वापर होतो.

नोव्हेंबर महिन्यात अन्नधान्य चलनवाढीचा दर ८.७० टक्क्यांवर पोहोचला. ऑक्टोबर महिन्यात हा दर ६.६१ टक्क्यांवर होता. २०२४ मधील लोकसभेच्या निवडणुका लक्षात घेता महागाई काबूत ठेवण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहे. भारत मुख्यतः इंडोनेशिया, मलेशिया आणि थायलंडमधून पाम तेल खरेदी करतो. अर्जेंटिना, ब्राझिल, रशिया आणि युक्रेनमधून सोयबीन आणि सूर्यफुल तेलाची आयात करतो. भारताने सरत्या वर्षात विक्रमी एक लाख ४१ हजार कोटी रुपयांच्या खाद्यतेलाची आयात केली. २०२० मध्ये देशाने केवळ सत्तर हजार कोटी रुपयांच्या खाद्यतेलाची आयात केली होती.

## शब्दकोडे-२८७



**आडवे शब्द**

१. कमळासारखे डोळे असलेला ६. 'आस्था' वाहिनीमुळे परिचित झालेले आणि सध्या वादग्रस्त ठरलेले प्रवचनकार ११. शरम १२. छाती १३. 'घडून गेलेले' या अर्थाचा व्याकरणातील शब्द १५. चर्चा १६. मालक १७. आजार-दु:ख इ. दूर करणारा १८. बुद्धिबळातील शिपाई १९. बारा वर्षाचा काळ २१. समशेर २३. शूर पुरुष २५. अंकुर, कोंब २७. लबाड, लुटणारा २८. काचेला पडलेली चिर ३०. नाश पावलेले, नष्ट ३२. सडक, मार्ग ३३. पुढे अर्धा वाकलेला ३४. घागरा ३६. मोठा गोतावळी, कुटुंबकबिला ३७. मृत्यूचा राजा ४०. होडी ४१. अथवा, किंवा ४३. मनुष्यदेह ४५. सैन्याचा तळ, नाव ४७. थोर, मोठा ४९. साठ मिनिटे ५०. पायजमा ५२. नभ, आकाश ५४. सैन्याचा दाणागोटा ५७. अटींची भाषा ५९. बैलगाडी ६०. निर्धन माणूस ६३. तीव्र रेचक ६४. सांज ६५. हत्तींचा शिक्षक ६६. कुराणातील वचने ६८. रोग ६९. फुरसत ७२. पुणे-मुंबई लोहमार्गावरील बटाटेवड्यासाठी प्रसिद्ध असलेले गाव ७३. दैववान, सुदैवी ७८. दोन पदार्थांचे एकत्रीकरण ७९. चरण ८१. परंतु, अट ८२. कार्य, काज ८३. निखळ सौंदर्य, संगमरवरी दगड ८४. लाकूड कापण्याचे हत्यार

**उभे शब्द**

१. कलाकार २. मला ३. लोणी ४. कुबेरचा सेवक ५. संध्याकाळची हुरहुर लावणारी वेळ ६. आरोप ७. सध्याचे सुप्रसिद्ध योगगुरु ८. चामखीळ ९. लहान मुलांची शाळा १०. मुलगा, पुत्र (सं.) १३. सगळीकडे मिळणारी एक शेंगभाजी १४. उसाचा कढवलेला घट्ट रस १७. निकाल, निर्णय २०. वाचणे, पाठ म्हणणे २२. वाईट सयय, खोड २४. खोडण्याचे साधन २६. मार्गस्थ २७अ. पुन्हा पुन्हा ३१. प्रत्येक महिन्यास ३३. कसेबसे ३५. पांढुरका रंग ३८. माणूस ३९. स्वर्गाचे दोन पहारेकरी ४२. एक तारवाद्य ४४. फळातील द्रव ४६. तमाशाचे कथानक ४७. अंत:करण ४८. पाताळ ५१. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र ५३. जाडजूड व्यक्ती ५५. झाडलोट, शिंपण इ.काम ५६. नाद ५८. चांदी ५९. शेराचा सोळावा भाग ६१. गणपतीचे एक नाव ६७. अर्धांगवायू ६८. संसाराचा पसारा ६९. नाव नसलेले बोट ७०. प्रेत जाळण्याची चिता ७१. एक तीर्थक्षेत्र ७५. एक रंगीत कंदमूळ ७६. डोळे ७७. अंड्यातील पिवळा भाग ७९. बळाभाषते पाणी ८०. शेवट

### शब्दकोडे-२८६ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.नंतर ३.नामकरण ६.भुजंग ९.जलाशय ११.सनई १३.वर्तन १४.ईश १५.तरुवर १८.वासलात १९.लव २२.पारवा २३.सोम २५.तनयतनया २८.नवकोटनारायण ३२.वानर ३३.कार ३४.रोगी ३५.सम ३६.सदा ३७.कलकलाट ३९.नकलाकार ४१.रचना ४२.रखरख ४३.क्षालन ४७.तणतण ४९.तार ५०.लाजरी ५१.दिनांक ५२.रीतसर ५३अ.जल ५४.उकीडवा ५५.सतत ५७.पलंग ५८.राजकुमार ६०.मणेर ६१.परका ६३३.वार्ताहर ६५.टमटम ६६.दम ६७.कटकट ६९.रवाना ७१.कणीदार ७३.पाया ७४.कला ७६.नयन ७८.करतल ७९.पातक ८०.थप्पी ८१.वहाण

**उभे उत्तर**

१.नंदीबैल २.रजई ३.नाश ४.मयत ५.रमावर ६.भुईसपाट ७.गवत ८.धन १०.लाश १२.नवा १६.रुपाया १७.रवानगी २०.वतनदार २१.गतकाल २३.सोय २४.मणका २६.नर २७.नरक २९.कोरा करकरीत ३०.नासका ३१.रामरक्षा ३२.वास ३४.रोट ३७.कनात ३८.लामणदिवा ३९.नख ४०.लाख ४२.रसकसणे ४४.लता ४५.नरमगरम ४६.निलाजरा ४८.तास ५०अ.जलज ५३.रपका ५४.उमा ५४अ.कीरवा ५६.तरट ५९.कुमक ६०.मरवा ६१.पटकन ६२.रमणीय ६४.हरकत ६६.दर ६७.कलंक ६८.टपाल ७०.नाक ७२.दानव ७५.लाथ ७७.व्रण

## पाणबुडी प्रकल्पात विरोधकांचे बुडबुडे!

प्रत्येक गोष्टीला विरोध करण्याने कोकण २५ वर्षे आपण मागे घेऊन चाललोय. याचा विचार आपण कधीतरी करणार आहोत की नाही. राजकीय नेत्यांनी राजकारण जरूर करावे; परंतु कोकणच्या मुळावर येणारे, कोकणला मागे घेऊन जाणारे राजकारण अजिबात नको. निवडणुकीच्या विजयाची गणिते मांडण्यासाठी लोकांना उठवून घालण्याचे काम केले जाते. चर्चेवर आणि अफवांवर भरवसा ठेवून नकारात्मक चर्चा करून वातावरण बिघडवणाऱ्यांमुळे आजवर कोकणचे नुकसानच झाले आहे. चांगल्या-वाईटाच्या हिशोबाची मांडणी करणार कोण? जेव्हा एखादा प्रकल्प नको म्हणून आपण विरोध करत असू तर चांगलं काय आहे ते आणण्याचा तरी प्रयत्न होतोय काय? विरोध करणारी राजकीय नेतेमंडळी फक्त विरोध करतात. नाकारताना आणखी काय हवंय ते आणण्यासाठी कधी प्रयत्न झाल्याचे आजवर ऐकीवात नाही. यामुळे फक्त नकारघंटाच वाजविली जाते. हे जनतेनेच कधीतरी थांबवावे. वेंगुर्ले निवती रॉक गार्डन येथे पाणबुडी प्रकल्प जेव्हा जाहीर झाला तेव्हाच गुजरातमध्येही पाणबुडी प्रकल्प जाहीर झाले. यामुळे महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातला गेला म्हणून हाकाटी पिटत बसण्यापेक्षा पाणबुडी प्रकल्पाचे काम लवकर कसे सुरू होईल यासाठी प्रयत्न झाले असते, तर ते अधिक चांगले झाले असते; परंतु खोट्या गोष्टींवर अफवा पसरवून त्यावर आधारित राजकारण करण्याचा प्रयत्न करायचा हाच ज्यांचा राजकीय बेस असेल तर चांगले आणि विकासकाम करण्यासाठी कसे काय प्रयत्न होणार? ते होऊच शकत नाहीत.

पाणबुडी प्रकल्पावरून असे काही राजकारण करण्यात आले ते पाहून हसावं की रडावं हा प्रश्न कुणालाही पडू शकेल. कोकणात आलेला किंवा येऊ घातलेल्या प्रत्येक प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांनी पाणबुडी प्रकल्पावर बोलायचे हे आश्चर्यकारक आहे. अदानींचा प्रकल्प येऊ दे, नाही तर अंबानींचा प्रकल्प येऊ दे जर कोकणात रोजगाराच्या संधी निर्माण होणार असतील आणि शेतकऱ्यांना सन्मानजनक योग्य मोबदला मिळणार असेल तर ते चांगले आहे. लोकहिताचे, रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देणारे प्रकल्प कोकणात यायलाच पाहिजेत. कोणताच प्रकल्प नको म्हणणारे आणि विरोध करणाऱ्यांनी एखादा तरी रोजगार उपलब्ध करून देणारा प्रकल्प आणला आहे का? एखादा प्रकल्प आणावा, रोजगार निर्माण करावा मग आपल्या विरोधाला, बोलण्याला अर्थ प्राप्त होतो. अहो, विरोध करणारे प्रत्येक वाडीत, गावात कोकणात आहेतच की. गावात काही होतंय म्हटल्यावर अशांचा विरोधच असतो. कशासाठी विरोध आहे असे विचारले तर ते सांगता येत नसते. पण आमचा ठाम विरोध आहे असे सांगतात. त्यामुळे गावातील 'टिपिकल' कोकणच्या माणसाच्या मनातला हा विरोध सकारात्मक विचारातून बदलेल तोच कोकणसाठी सुदीन असेल.

**समाप्त**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# मुंबईतील जरांगे पाटील यांच्या आंदोलनात लाखोंच्या संख्येने सहभागी व्हा

## मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक करण गायकर यांचे आवाहन





नाशिक । प्रतिनिधी

मराठा योद्धा जरांगे पाटील यांचे हात बळकट करण्यासाठी स्वतःची शिदोरी आपल्या कुटुंबासह घेत मुंबई येथील आंदोलनात सहभागी होणार असल्याचा मराठा समाजाचा नाशिक जिल्ह्यातील बैठकांमध्ये निर्धार करण्यात आला आहे. दरम्यान मुंबईतील जरांगे पाटील यांच्या आंदोलनात लाखोंच्या संख्येने सहभागी व्हा असे आवाहन मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक करण गायकर यांनी केले आहे.

मुंबई स्थित आंदोलनासाठी जिल्ह्यातील त्रंबकेश्वर, इगतपुरी व सिन्नर तालुक्यामध्ये मराठा समाजाच्या बैठका पार पडल्या.

मुंबई येथे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यात जनजागृती दौरा दि. ५ ते ११ जानेवारी दरम्यान सुरू करण्यात आलेला आहे. या दौऱ्याची सुरुवात नाशिक येथील शिवतीर्थावर छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना देवून करण्यात आली. यावेळी नाशिक येथील सकल मराठा समाजाच्या वतीने नाना बच्छाव, चंद्रकांत बनकर, शिवाजी सहाणे, करण गायकर, ज्ञानेश्वर कवडे, विष्णुपंत घुगे, वैभव दळवी, शरद लोणकर, कैलास खांडबहाले, योगेश नाटकर, विकी देशमुख, निलेश ठुबे, हर्षल पवार, ज्ञानेश्वर सुराशे आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुका निहाय बैठकीची सुरुवात सकाळी ११ वाजता सुखसागर हॉटेल येथे त्र्यंबकेश्वर तालुक्याची बैठक संपन्न झाली. त्यानंतर दुपारी ३ वाजता मातोश्री लॉन्स या ठिकाणी इगतपुरी तालुका तर संध्याकाळी ६ वाजता शासकीय विश्रामगृह, सिन्नर येथे सिन्नर तालुक्यातील मराठा समाज बांधवांच्या बैठक संपन्न झाली. यावेळी मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक करण गायकर यांनी बैठकीमध्ये दि. २४ जानेवारी रोजी मुंबई येथील आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील मराठा बांधवांनी जास्तीत-जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले. मराठा योद्धा जरांगे पाटील यांनी उभा केलेला हा लढा गरीब मराठ्यांसाठी असल्याने सर्व मराठ्यांनी या आंदोलनाला ताकद द्यावी तसेच सहकुटुंब आपआपली शिदोरी सोबत घेऊन या, आंदोलनात सक्रिय सहभागी व्हावे. तसेच तालुक्यातील मराठा समाज बांधवांच्या घरोघरी जावून कालपासून जनजागृती करत मुंबई येथे सर्वांनी येण्याचे निमंत्रण द्यावे. हा अंतिम लढा असून या लढ्यामध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळेलच आणि हे सत्य आहे. आता आरक्षण मिळूनच आपण घरी येणार आहोत हा संकल्प करूनच मुंबईला सर्व मराठा समाजाने येण्याचे आवाहन केले.

त्याचप्रमाणे मराठा नेते शिवाजी सहाणे यांनी सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्रातून जे मराठा बांधव आंदोलनामध्ये सहभागी होणार आहे त्यांच्या भोजन व्यवस्थेसाठी आपल्याला आपल्या जिल्ह्यातून धान्य, तांदूळ, तेल, शेंगदाणे, डाळ यांसह अन्य लागणारी अन्न सामग्री आपल्या तालुक्यातील गण, गट व तालुक्याच्या ठिकाणी जमा करावे. तसेच समाजातील दानशूर व्यक्ती आर्थिक मदत करणार असतील तर ती त्यांनी सकल मराठा समाजाच्या नावाने कार्यान्वित करण्यात येणाऱ्या बँक खात्यामध्ये क्यू आर कोडच्या माध्यमातून ऑनलाइन जमा करावे असे आवाहन केले.

नाशिकमधील उपोषणकर्ते नाना बच्छाव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मागील आंदोलनाचा इतिहास पाहता मराठ्यांनी हे आंदोलन अत्यंत शिस्तप्रिय व शांततेच्या मार्गाने करायचे आहे. मुंबईला कोटींच्या संख्येने जमून मुंबई बंद पाडायची आहे, त्यासाठी सर्वांनी एकजुटीने, एक दिलाने या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन समाज बांधवांना केले. त्रंबकेश्वर येथील बैठकीत मराठा समाज बांधव पुरुषोत्तम कडलक, नवनाथ कोठुळे, रवींद्र वारुंगसे, कैलास मोरे, बाळासाहेब वारुंगसे, संतोष मेढे, ज्ञानेश्वर महाले, शिवाजी कसबे, रंगनाथ मिंदे, राज चव्हाण आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ईगतपुरी येथील बैठकीत नारायण जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य जया जाधव,भाऊसाहेब कडभाने, रवींद्र गव्हाणे, तुकाराम सहाणे, नामदेव शिंदे, संदीप बरे, विजय जाधव, प्रताप जाधव, मनोज सहाणे आदी उपस्थित होते.

तसेच सिन्नर येथील तालुक्याच्या बैठकीत विलास पांगारकर, विठ्ठल राजे उगले, ज्ञानेश्वर ढोली, प्राध्यापक राजाराम मुंगसे, पप्पू गोडसे, स्वप्निल डुंबरे, प्रा. सचिन उगले, दत्ताजी वायचळे, रवींद्र मोगल, कॉम्रेड हरिभाऊ तांबे, दत्ता हरळे, अण्णासाहेब खाडे, अमोल देशमुख, मिलिंद गायकवाड, अतुल पांगारकर, आदित्य उगले, वामनराव गाडे, राजेंद्र चव्हाणके आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व समाज बांधवांनी तालुक्यात जिल्हा कमिटीने सांगितल्याप्रमाणे नियोजन करण्याचे ठरवले असून जास्तीत-जास्त संख्येने मुंबई येथे मिळेल त्या वाहनाने व सोयीने रसद पुरवठा करू असे आश्वासन दिले आहे.

## न्यूज कॉलम

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

शिरपूर । येथील आर. सी.पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ३ जानेवारी २०२४ रोजी सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. जया बाविस्कर यांनी केले.

### लताबाई सैंदाणे यांचे निधन



धुळे । शहरातील मोगलाई परीसर प्रसिद्धी प्रमुख आबासाहेब सैंदाणे यांच्या मातोश्री लताबाई पितांबर सैंदाणे (७५) यांचे वृध्दापकाळाने आज दि.६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# लोकमान्यकडून भोंसलामधील विद्यार्थ्यांसाठी १ कोटींची देणगी

### लेफ्टिनेंट जनरल (सेवानिवृत्त) डी.बी. शेकटकर यांचे मोलाचे मार्गदर्शन




नाशिक । प्रतिनिधी

लोकमान्य मल्टीपर्पज को-ऑप सोसायटी लिमिटेड नेहमीच राष्ट्र विकास या मूल्याला महत्व देत आले आहे. किंबहुना हा लोकमान्यच्या कामाचा अविभाज्य भाग आहे. हीच परंपरा कायम राखत लोकमान्यकडून सेन्ट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीच्या (भोंसला) नाशिकमधील विद्यार्थ्यांसाठी १ कोटींची देणगी जाहीर केली आहे. दरवर्षी गुणवंतांच्या यादीत पहिला येणारा आणि इतर गरजू विद्यार्थ्यांना या देणगीच्या व्याजातून शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. याबाबतची कार्यालयीन कागदपत्रांची पुर्तता नुकतीच करण्यात आली असून भोंसलाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत धनादेश सुपूर्द करण्यात आला आहे. आगामी वर्षांपासून ही शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

यावेळी लोकमान्यच्या संचालिका सई ठाकूर - बिजलानी, लोकमान्यचे सल्लागार प्रीतम बिजलानी, नाशिक क्षेत्रिय व्यवस्थापक हेमंत फडके, बांधकाम व्यवसायिक श्वेता कोठारी, भोंसलाचे कार्यकारी अध्यक्ष अविनाश भिडे, सचिव हेमंत देशपांडे, सहसचिव माधव बर्वे यांच्यासह कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

या शिष्यवृत्तीबाबत लोकमान्यचे संस्थापक अध्यक्ष किरण ठाकूर यांनी सांगितले की, भोंसला देशाची युवा पिढी घडविण्याचे महत्वाचे कार्य यशस्वीरीत्या करत आहे. तेव्हा या कार्यात आपलाही सहभाग असावा या विचारातून लेफ्टिनेंट जनरल (सेवानिवृत्त) डी.बी. शेकटकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही शिष्यवृत्ती सुरु करण्यात आली आहे. यामुळे गरजू विद्यार्थ्यांला मदत होणार असून त्याचा प्रगतीचा मार्ग सुकर होणार आहे. अभ्यास करतांना फी भरण्याचा असलेला ताण कमी होईल. सोबतच लोकमान्यचे भारतीय लष्करासोबत जिव्हाळ्याचे नाते आहे. लष्करात कार्यरत असलेल्या आजी माजी जवान, शहीद जवानांच्या विधवा पत्नी यांना लोकमान्यचे ठेवीदार बनल्यानंतर अर्धा टक्का अधिक व्याज दिले जाते. या शिष्यवृत्तीमुळे हे नाते आता नक्कीच अधिक दृढ होत आहे. लोकमान्यच्या संचालिका सई ठाकूर - बिजलानी यांनी अधिक माहिती देतांना सांगितले की, देशाच्या विकासात लोकमान्यने नेहमीच आपली जबाबदारी उचलली आहे. याआधीही सुद्धा अनेक माध्यमातून लोकमान्य जनसेवा करत आली आहे. बेळगावमध्ये असलेल्या मराठा लाईट इन्फंट्रीच्या संग्रहालयाचे संवर्धन, शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणी, दान स्वरूपात रुग्णवाहिका अशा स्वरूपात लोकमान्यने नेहमीच मदत केली आहे. अशा उपक्रमाच्या माध्यमातून लोकमान्यला लष्कराची सेवा करण्याची संधी मिळत असते अशी आमची भूमिका आहे. देशाच्या विकासात लोकमान्यचा असा आहे सहभाग. लोककल्प फौंडेशनची निर्मितीतून कार्य. दुर्गम भागातील ३२ खेड्याचे घेतले पालकत्व. महिला सक्षमीकरण आणि रोजगार निर्मितीवर भर दिला जात आहे.



# पत्रकारांना स्ट्रॅटेजिक कम्युनिकेटर म्हणून खूप संधी उपलब्ध – जोशी

नाशिक । प्रतिनिधी

पत्रकारितेचे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना डिजिटल जगतात स्ट्रॅटेजिक कम्युनिकेटर म्हणून खूप संधी उपलब्ध आहेत. डिजिटल माध्यमांचा वापर करून राजकारण्यांपासून, लहान-मोठे व्यवसायिक, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, संस्था, इत्यादींचे ब्रॅण्डिंग अथवा इमेज बिल्डिंग करता येते, तसेच पत्रकारिता आणि जनसंज्ञापनाचे शिक्षण वृत्तपत्रविद्या पुरतेच मर्यादित राहिलेले नसल्यामुळे पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट सेक्टरमध्ये सोशल मीडिया मॅनेजर अथवा सोशल मीडिया हँडलर म्हणून काम उपलब्ध आहे. अशी माहिती डिजिटल पत्रकारिता तज्ञ पंकज जोशी यांनी दिली.

के टी एच एम महाविद्यालयातील पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग आयोजित 'पत्रकारांसाठी डिजिटल माध्यमांचा वापर' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. माहितीच्या स्फोटात पत्रकारांनी योग्य ती माहिती प्रसारित करून जांभेकरांच्या लोकशिक्षणाचा व जनांना सज्ञान करण्याचा वसा पुढे चालू ठेवावा असे आवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर यांनी केले.

प्रास्ताविकात, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे कार्य आणि सद्यस्थितीतील पत्रकारांसमोरील आव्हाने या विषयी माहिती विभागप्रमुख प्रा. प्राची पिसोळकर यांनी दिली. तर विद्यार्थी समाधान बागुल याने आभार मानले.




# मोदींच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे भारताची प्रतिमा जगभरात उंचावली - चौधरी

### उत्तर महाराष्ट्र ओबीसी मोर्चा महा विजय २०२४ भाजपाची संयुक्त बैठक संपन्न

नाशिक । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी जगमान्य विश्व नेतृत्व असून त्यांच्या लोकप्रियतेमुळेच भारताची प्रतिमा जगभरात उंचावली आहे असे प्रतिपादन भाजप प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी यांनी केले. ते सातपूर येथील अयोध्या सभागृहात ओबीसी मोर्चाच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय बैठकीत बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर ओबीसी मोर्चा प्रदेश अध्यक्ष संजय गाते, नाशिक शहराध्यक्ष प्रशांत जाधव, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, नाशिक ग्रामीण उत्तर अध्यक्ष शंकर वाघ, नाशिक दक्षिण ग्रामीण अध्यक्ष सुनील बच्छाव, ओबीसी मोर्चा प्रदेश सरचिटणीस गुरूदेव कांदे, प्रदेश सरचिटणीस बापू घडामोडे, प्रदेश सरचिटणीस विनोद दळवी, युवा संपर्कप्रमुख महाराष्ट्र राज्य मच्छिंद्र सानप, उत्तर महाराष्ट्र प्रभारी दीपक पवार, प्रदेश चिटणीस नंदकुमार जेजुरकर, प्रदेश संपर्क प्रमुख रवींद्र चव्हाण, प्रदेश सह संपर्क प्रमुख मनोज ब्राम्हाणकर, उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख भरत महाजन, उत्तर महाराष्ट्र सहसंयोजक तसेच जिल्हाध्यक्ष ओबीसी महिला मोर्चा नाशिक दक्षिण ग्रामीण सुषमा चौधरी-गोराणे, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष माया परदेशी, नाशिक शहर सरचिटणीस सुनील केदार, नाशिक शहर सरचिटणीस अँड. श्याम बडोदे, उत्तर महाराष्ट्र युवा संपर्कप्रमुख मनोज शिरसाठ, ग्रामीण दक्षिण जिल्हाध्यक्ष कैलास पाटील आदी उपस्थित होते. पुढे ते म्हणाले विरोधकांनी काश्मीर प्रश्नावर खूप आग पाखड केली. ३७० हटवलं तर रक्ताचे पाट वाहतील असे विरोधी पक्षातील काही नेते म्हणत होते. परंतु विरोधकांना भ्रमनिराश करीत रक्ताचा एक थेंब न सांडता मोदी सरकारने ३७० कलम हटवले. मोदींच्या नेतृत्वाखाली भारत विश्व गुरू झाला असून सद्य परिस्थितीत सुरू असलेले मोदींना हटवण्याचे विरोधकांचे स्वप्न भारतातील सुज्ञ जनता कधीच पूर्ण होऊ देणार नाही असे ते म्हणाले. ओबीसी मोर्चा येत्या लोकसभेत भाजपला घवघवीत यश मिळवून देण्यासाठी समर्पित भावनेने काम करेल असे ते म्हणाले.

# मारवाडी युवा मंच मिडटाऊन, लक्ष्मीनारायण महिला मंडळतर्फे आज काईट फेस्ट

नाशिक । प्रतिनिधी

शहराच्या मध्यभागी, जिथे क्षितिज आकाशाच्या अमर्याद निळ्या कॅनव्हासला भेटते, तिथे एक दोलायमान देखावा आता उलगडला जाणार आहे. काईट फेस्ट २०२४, रंग, संस्कृती आणि सौहार्द यांचा चमकदार उत्सव हा ७ जानेवारी रविवार रोजी सकाळी दहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत आकाशाला गवसणी घालणार आहे. मारवाडी युवा मंच मिडटाऊन आणि लक्ष्मीनारायण महिला मंडळ यांनी एबीएच फ्री लँड, गंगापूररोड, नाशिक येथे पतंगोत्सव आयोजित केलेला असून हा कार्यक्रम अत्यंत उत्साहाने निखळ आनंदाचा आणि उत्सवाचा दिवस असल्याचे वचन देत आहे.

या आनंददायी अनुभवात सहभागी होण्यासाठी शहराच्या कानाकोपऱ्यातून कुटुंबे, मित्र आणि पतंगप्रेमी एकत्र येणार आहेत. मारवाडी युवा मंच मिडटाऊन आणि लक्ष्मीनारायण महिला मंडळाने सर्व वयोगटातील आणि आवडीनिवडी पूर्ण करणारा एक दिवसभरासाठी पतंगोत्सव ठेवला आहे. दरम्यान पतंग बनवण्याच्या कार्यशाळेत गुंतलेल्या मुलांचे चेहरे यामुळे उजळून निघतील, त्यांची स्वतःची उत्तुंग कलाकृती बनवण्याची प्राचीन कला ते शिकतील. यात स्पर्धात्मक भावना, थरारक पतंग उडवण्याच्या स्पर्धांसह, चित्रकला स्पर्धा, पतंग सजवण्याची स्पर्धा, संक्रांत स्पेशल पाक कला स्पर्धा आणि ग्रुप मॅचिंग स्पर्धा अशा विविध स्पर्धा उड्डाण घेतील. ज्यात कौशल्य विरुद्ध कौशल्य आणि सौहार्द विरुद्ध सौहार्द आहे. त्यामुळे सहभागींच्या चमकणाऱ्या पतंगांनी सजलेल्या रात्रीच्या आकाशाच्या सौंदर्याचा आनंद घेता येईल.


प्रोसेस पेड

अॅड.सौ. अरूणा डी. महाजन
निशाणी क्र.-६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज. नं. १३९९/२०२३

श्रीमती सुमनबाई भ्र. चंद्रकांत भामरे व इतर ... अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ... सा.वाला

कै. चंद्रकांत उर्फ चंद्रराव गेनू भामरे (मृत्यु दिनांक : १०/०५/२०२२)
मृत्यु समयीचा पत्ता : रा. कापडणे, ता.जि.धुळे ...... मयत

कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी (Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. चंद्रकांत उर्फ चंद्रराव गेनू भामरे यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ७ यांचे कोर्टात दिनांक १८/०१/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत/प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. चंद्रकांत उर्फ चंद्रराव गेनू भामरे यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत एकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि. ०५/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरुन
शिक्का
कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय क.स्तर, धुळे
अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर, धुळे



**जाहिर नोटीस**

सदर जाहिर नोटीसीत नमुद केलेले १ ते ८ शेतकरी / पक्षकार यांनी दिलेली माहिती व अधिकारावरुन अॅड. पी.एम.बडगुजर व अॅड. सुनिता चव्हाण, दोघे रा. १५ मुंदानकरवाडी, डॉ. चेतन पाटील यांच्या दवाखान्यासमोर, वाडीभोकर रोड, धुळे ता. जि. धुळे, यांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

या नोटीसीत खालील नमुद केलेल्या शेतकऱ्यांची मौजे दहिवद, ता. चाळीसगांव, जि. जळगांव येथील शेतजमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ करीता शासनाने संपादित केलेल्या जमीनीचे मे. लवाद न्यायालय जळगांव यांच्याकडे लवाद दाव्याकामी तुम्हाला संयुक्तीकरित्या वकीलपत्र दिलेले होते. त्या शेतकऱ्यांचे लवाद दाव्यातील नांव, गट क्रमांक व लवाद दावा क्रमांक येणेप्रमाणे आहेत.

१. देविदास राजधर निकम गट क्रमांक-४७८/७, लवाद दावा क्रमांक-२१/२०१७
२. कमलबाई दुर्वास पाटील गट क्रमांक-२९३/१ व २९३/२, लवाद दावा क्रमांक- १७/२०१७
३. भास्कर बाबुराव वाघ (मयत) गट क्रमांक-३३०/२/१ व, लवाद दावा क्रमांक- २०/२०१७ व
म/वा. पंडीत भास्कर वाघ गट क्रमांक-२६०, ५९/२०१७
४. मिनाबाई अशोक वाघ गट क्रमांक-२५९/२/२अ व २५९/१/अ/२/१, लवाद दावा क्रमांक- २३/२०१७ व ४३/२०१९
५. गोकुळ भिला पाखले गट क्रमांक- ४४६/१/अ लवाद दावा क्रमांक- १६३/२०१७ व ३८/२०१८
६. अशोक मुरलीधर पाटील गट क्रमांक- ३३०/१/क, लवाद दावा क्रमांक- २५/२०१७
७. मालुबाई भिकन वाघ गट क्रमांक-२५९/२अ/१/३, लवाद दावा क्रमांक- १२८/२०१८
८. तुकाराम तुळशिराम जाधव (मयत)
म/वा. सुमनबाई तुकाराम जाधव गट क्रमांक- ४६५/१, लवाद दावा क्रमांक-३८/२०१७

२. सदर जाहिर नोटीस देणार यांच्या जळगांव येथील दाखल लवाद दाव्यात तुम्ही वकील म्हणुन व्यक्तीगतरित्या लक्ष देवुन कोणतीही कार्यवाही व कामकाज केलेले नाही. तसेच जाहिर नोटीस देणार यांना कोणतीही माहिती दाखल केलेल्या लवाद दाव्याबाबत दिलेली नाही, त्यामुळे सदर नोटीस देणार यांनी तुमचे वकीलपत्र रद्द करणेबाबत वेळोवेळी नोटीसा दिलेले आहेत. सदर वेळोवेळी दिलेले नोटीसा आपण घेण्यास टाळाटाळ करतात / घर बंद आहे / ऑफिस बंद आहे, असा पोस्टाने टिप्पणी मारुन सदर तुम्हा पोस्टाद्वारे पाठवलेले नोटीसा जाहिर नोटीस देणार यांना परत केलेले आहेत, त्यामुळे जाहिर नोटीस देणार हे सदरची जाहिर नोटीस देत आहेत की,

अ. जाहिर नोटीस देणार यांच्या जळगांव येथील दाखल केलेल्या लवाद दाव्याबाबत तुम्ही वकील म्हणुन व्यक्तीगतरित्या लक्ष देवुन कोणतीही कार्यवाही व कामकाज केलेले नाही. तसेच तुम्ही जाहिर नोटीस देणार यांना कोणतीही योग्य माहिती दिलेली नाही, त्यामुळे सदर जाहिर नोटीस देणार यांनी तुमचे वकीलपत्र या जाहिर नोटीसीने रद्द केलेली आहे.

तरी यापुढे जाहिर नोटीस देणार यांच्या जळगांव येथील दाखल लवाद दाव्यात वकील म्हणुन कोणतीही कामकाज पाहु नये. त्याकरीता सदरचा जाहिर नोटीसीने तुम्हास कळविण्यात येत आहे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे...
ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०६/०१/२०२४

नोटीस देणारचे अॅडव्होकेट
अॅड.व्हि.डी.झाल्टे, धुळे



अॅड. एम. व्ही. घरटे
निशाणी क्र.-६

**धुळे येथिल मे. ८ वे सह दिवाणी न्यायाधिश सो., (क.स्त.) यांचे कोर्टात**

३५/२०२४

१. श्रीमती मंजुळा अर्जुन भोई उ.व.- ६३, धंदा-गृहीणी,
२. सौ. जयश्री रविंद्र शिवदे उ.व.-४४, धंदा-गृहीणी,
रा. संदर्भ सेवा रुग्णालय, टाईप २ बी, रुम नं. १०२, शालीमार, नाशिक.
३. सौ. गुणवंती अर्जुन भोई उ.व.-३९, धंदा-गृहीणी,
४. सौ. भावना अर्जुन भोई उ.व.-३६, धंदा-गृहीणी,
५. सौ. प्रियंका अर्जुन भोई उ.व.-३३, धंदा-गृहीणी,
क्रं. १ व ३ ते ५ रा. ४, गायत्री नगर, एस.एन.डी.टी. कॉलेज जवळ, देवपुर, धुळे. ... अर्जदार

विरूध्द

कै. अर्जुन कोंडाजी भोई मृत्यु दिनांक : ०४/१२/२०२२
मयताचा पत्ता -४, गायत्री नगर, देवपुर, धुळे. ...... सा. वाला

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

अर्जदार क्र. १ ते ५ यांनी ते मयत कै. अर्जुन कोंडाजी भोई यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाकामी कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी दिनांक : १७/०२/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आपण स्वत: अथवा आपल्या वकीलांमार्फेत हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.

३. उक्त दिवशी व वेळी कोणी हजर न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन पुढील आदेश पारीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहीनिशी आज दि. ०५/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : ०५/०१/२०२४
शिक्का
आदेशावरुन
कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय (व.स्त) धुळे.
अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व.स्त) धुळे.



अॅड. अनिल किसन गवळी
निशाणी क्र.-६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश (क) स्तर सो.धुळे यांचे कोर्टात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २८/२०२४

निलाबाई मच्छिंद्र पाटील ... अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ... जाबदेणार

कै. मच्छिंद्र श्रावण पाटील ...... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ यांनी धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट धुळे यांचे कडे दि. ०३/०१/२०२४ रोजी कि.दि.अर्ज नं. २८/२०२४ चा अर्ज कै.मच्छिंद्र श्रावण पाटील रा. बोरसे गल्ली, मु.पो कापडणे, ता. जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. मच्छिंद्र श्रावण पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत, असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि. १६/०२/२०२४ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की,सदर अर्जासबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. १ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूवी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/ हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

धुळे
दि. ०५/०१/२०२४
आदेशावरुन
शिक्का
कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, धुळे
अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, धुळे

## न्यूज कॉलम

### संगणक साक्षरता; विद्यार्थ्यांना आवाहन

**धुळे ।** तालुका पंचायत समिती दहा टक्के सेस फंड अनुदानातून सातवी ते बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करणार आहे. पंचायत समितीस्तरावर संगणकाबाबत ज्ञान, कौशल्य प्राप्त करून घेण्यासाठी सातवी ते बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी १० जानेवारीपर्यंत अर्ज सादर करण्याची मुदत आहे. विद्यार्थ्यांनी मुदतीन अज सादर करावे, असे आवाहन पंचायत समिती सभापती वंदना मोरे व उपसभापती देवेंद्र माळी यांनी केल्याचे बालविकास प्रकल्प अधिकारी दीपाली हिवराळे यांनी सांगितले.

### उसनवारी वाद एकाला मारहाण

**धुळे ।** उसनवार दिलेले एक हजार रुपये परत मागितले या कारणावरून निसार गफार पिंजारी (वय ३९, रा. पूर्व हुडको, चाळीसगव रोड, धुळे) यांना शिवीगाळ करत हाताबुक्क्याने मारहाण करण्यात आली. ही घटना सोमवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलिस ठाण्यात गुरुवारी सायंकाळी गुन्हा दाखल झाला.

### चर्मकार समाजाचा वधू-वर परिचय मेळावा

**धुळे ।** चर्मकार समाजाचा वधू-वर परिचय मेळावा ७ जानेवारी रोजी सकाळी १० ते ५ यावेळेत शेवंता लॉन्स, नांदूर नाका, नाशिक येथे आयोजित करण्यात आलेला आहे. उपस्थितीचे आवाहन साहेबराव घोलप, अरविंद चव्हाण यांनी केलेले आहे.

# अक्कलपाडा उजवा आणि डाव्या कालव्यातून पाणी सोडावे

### आ.कुणाल पाटील यांची मागणी

**धुळे । प्रतिनिधी**

शेतकर्यांच्या रब्बी हंगामासाठी अक्कलपाडा प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्यातून पाणी सोडावे अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी जिल्हाधिकार्यांकडे केली आहे. दरम्यान या मागणीचे आ.पाटील यांनी जिल्हाधिकार्यांना पत्रही दिले आहे.

धुळे जिल्ह्यासह तालुक्यात दुष्काळाची स्थिती गंभीर बनत चालली आहे. विहीरींनी तळ गाठल्याने रब्बी हंगामासाठी अक्कलपाडा प्रकल्पातून पाणी सोडावे अशी मागणी धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांनी केली आहे. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना दिलेल्या पत्रात आ.कुणाल पाटील यांनी म्हटले आहे कि, दुष्काळामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. खरीप हंगाम हातचा गेल्याने शेतकरी पूर्णपणे कर्जबाजारी झाला आहे. पाऊसच न आल्याने धुळे तालुक्यातील नदी-नाले, पाझरतलाव कोरडे ठाक पडले आहेत. परिणामी जमीनीची पाण्याची



पातळी खालावली असून सिंचन विहीरी,कुपनलिकांनी तळ गाठला आहे. तसेच काही विहीरी पूर्णपणे आटल्या आहेत. रब्बी हंगामासाठी शेतकर्यांना गहू, हरभरा, कांदा, भूईमूग, दादर, ज्वारी यांची पेरणी ...ली आहे. तसेच भाजीपालासह फळपिकांचीही लागवड केली आहे. मात्र विहीरींनी तळ गाठल्याने रब्बी पिकांना पाण्याची कमतरता भासू लागली आहे.परिणामी पिके करपू लागल्याने पुन्हा एकदा शेतकर्यांच्या तोंडचा घास हिरावला जाण्याची भिती निर्माण झाली आहे. तसेच सिंचनाबरोबरच पशुपालक शेतकर्यांकडील जनावरांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फीरावे लागत आहे.

शिवाय गावांमध्येही पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे अक्कलपाडा प्रकल्पातील पाणी डावा आणि उजव्या कालव्यात सोडले तर रब्बी हंगामासाठी सिंचनाचा आणि काहीशा प्रमाणात पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने उजवा आणि डाव्या कालव्यात पाणी सोडावे अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी जिल्हाधिकार्यांकडे केली आहे.




# पटेल माध्यमिक विद्यालयाने दिली ऊसतोड कामगाराच्या मुलांना मायेची ऊब

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने ऊसतोड कामगार व त्यांच्या मुलांना थंडीच्या दिवसात स्वेटर वाटप करून मायेची ऊब दिली.

प्राचार्य पी.आर.साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली स्काऊट व एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी करवंद जवळील ऊसतोड कामगार यांची मुले व काही मातांना स्वेटर वाटप कार्यक्रम ३ जानेवारी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले बालिका दिवसाचे औचित्य साधून घेण्यात आला. ऊसतोड कामगार हे आपल्या लहान मुलांना घेऊन पोटाची खडगी भरण्यासाठी थंडीत गावोगावी आपले बिऱ्हाड घेऊन ऊस तोडण्यासाठी आलेले असतात. चित्र पाहून विद्यालयाचे स्काऊट शिक्षक बी.व्ही.मोरे व एन.एस.एस. प्रमुख बी.एन.अहिरे यांनी प्राचार्य पी.आर. साळुंखे, पर्यवेक्षक एस.डी.गाडीलोहार यांच्या मार्गदर्शना खाली स्वेटर व थंडीपासून संरक्षण देणारे कपडे वाटप केले.

# घातक नायलॉन मांजाची विक्री; ३६ हजारांचा मांजा जप्त, दोघांवर गुन्हे दाखल

**नाशिक । प्रतिनिधी**

शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये नायलॉन मांजाची विक्री व वापरांवर बंदी असताना, त्याची सर्रास विक्री होते आहे. अंबडच्या हद्दीतून २८ हजारांचा तर, नाशिकरोडच्या हद्दीतून ८ हजारांचा नायलॉन मांजाचा साठा जप्त करण्यात येऊन दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केवल पार्क परिसरामध्ये नायलॉन मांजाची विक्री होत असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार अंबडच्या पोलिसांनी शुक्रवारी (ता. ५) रात्री सात वाजता अमृतेश्र्वर महादेव मंदिराजवळ संशयित प्रथमेश ज्ञानेश्र्वर काळे (२१, रा. लक्ष्मण टाऊनशिप रो हाऊस, केवल पार्क) यास बंदी असलेला नायलॉन मांजा विक्री करताना पकडले. त्याच्याकडून २८ हजार रुपयांचा नायलॉन मांजाचे ७० गट्टू जप्त केले आहेत. पोलीस अंमलदार तुषार मते यांच्या फिर्यादीनुसार अंबड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, जेलरोड परिसरातील सैलानी बाबाजवळ चरणदास मार्केटसमोर नायलॉन मांजाची विक्री सुरू असल्याचे समजताच नाशिकरोड पोलिसांनी मेहूल महेश उगरेजिया (१९, रा. परिक्षीत सोसायटी, ओमनगर, जेलरोड) यास नायलॉन मांजा विक्री करताना पकडले. त्याच्याकडून ८ हजार ८०० रुपयांचा नायलॉन मांजा जप्त केला आहे.

### नाशिक पोलीस आयुक्त संघाची पत्रकार संघावर मात

**नाशिक।** पत्रकार दिनानिमित्ताने शहर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर झालेल्या क्रिकेट सामन्यामध्ये पोलीस आयुक्त संघाने पत्रकार संघावर पाच गडी राखून विजय मिळविला. पत्रकार संघाने निर्धारित षटकांमध्ये ८० धावा केल्या होत्या. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या संकल्पनेनुसार पत्रकार दिनानिमित्ताने पोलीस आयुक्तालय क्रिकेट संघ व पत्रकार क्रिकेट संघ यांच्यात क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी मैदानावर हजेरी लावत हाती बॅट घेतली आणि दोन चेंडूंना टोलावत स्पर्धेचे उद्घाटन केले.पोलीस आयुक्त संघाचे कर्णधार व गुन्हेशाखेचे उपायुक्त प्रशांत बच्छाव यांनी नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षणाना निर्णय घेतला.

# हट्टी खु. ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी कृष्णा खांडेकर

**धुळे । प्रतिनिधी**

हट्टी खु. (ता.साक्री) ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी कृष्णा भगवान खांडेकर यांची सर्वानुमते बिनविरोध नि निवड झाली आहे. हट्टी खु.गावाच्या इतिहासात कृष्णा खांडेकर हे सर्वात तरुण सरपंच म्हणून नोंद झाली आहे. त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, हट्टी खु.ता.साक्री येथील ग्रामपंचायतीच्या रिक्त झालेल्या सरपंच पदाची नुकतीच निवड करण्यात आली. सौ.रुपालीताई पदमोर यांचा सरपंच पदाचा नियोजित कार्यकाल संपल्याने त्यांनी राजीनामा



दिला होता. यावेळी माजी सरपंच सौ.रुपालीताई पदमोर,विद्यमान उपसरपंच सौ.केवळबाई दादा खांडेकर,माजी उपसरपंच भगवान गोविंदा मासुळे,फुला थोरात, अनिता नरोटे, म्हाळसाबाई शिंदे,मथुराबाई पदमोर,संतोष पदमोर, कैलास सोनवणे,मिराबाई संतोष मासुळे, दिपक पाटील, जरुर ठाकरे उपस्थित होते. कृष्णा खांडेकर हे सर्वात तरुण सरपंच म्हणून हट्टी गावाला लाभले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मंडळ अधिकारी वैशाली आंधळे यांनी काम पाहिले तर त्यांना ग्रामसेवक डी.जी.सुर्यवंशी यांचे सहकार्य लाभले.ज्येष्ठ नेते श्री वेडू आण्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवनियुक्त सरपंच कृष्णा खांडेकर यांचे गटनेते माजी पं.स.सदस्य त्र्यंबक दादा पदमोर, साईनाथ विद्याप्रसारक संस्थेचे चेअरमन किरण पदमोर यांनी सत्कार केला.

# पिंपळनेर येथील भिलाजी जिरे यांना उत्तर महाराष्ट्र पत्रकारिता पुरस्कार नाशिक येथे प्रदान

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



नाशिक येथील श्री. कालिका देवी मंदिर संस्थान तर्फे पिंपळनेर येथील पत्रकार क्षेत्रात सर्व क्षेत्रातील नैपुण्य पुर्ण बातमी चे संकलन करित पत्रकारितेत आगळीवेगळी छाप पाडणारे भिलाजी जिरे यांना उत्तर महाराष्ट्र पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आला

तर ज्येष्ठ पत्रकार व संपादक दिल्ली सुरेश भटेवरा यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी नाशिक क्रिडा व युवक सेवा संचालनालयाचे उपसंचालक रविंद्र नाईक, सुभाष तळाजिया, डॉ. प्रतापराव कोठावळे आदी उपस्थित होते. केशवराव पाटील, कोषाध्यक्ष सुभाष तळाजिया , सचिव डॉ. प्रतापराव कोठावळे आयोजन समिती अध्यक्ष अशोक दुधारे, सचिव आनंद खरे सह मराठी पत्रकार संघ धुळे जिल्हा व साक्री तालुका ,शहर पत्रकार संघ व पुर्व नियोजित पिंपळनेर तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य तसेच क्रिडा महासंघ राज्य उपाध्यक्ष डॉ. आनंद पवार आदिसह पिंपळनेर शहर व तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

### अवघ्या ८ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार

**नाशिक।** अवघ्या आठ वर्षांच्या चिमुरडीला कशाच्या तरी बहाण्याने स्वत:च्या घरी नेऊन तिच्यावर अत्याचार करणाऱ्या नराधमास गंगापूर पोलिसांनी अटक केली आहे. गणेश अरुण भामरे (३०, रा. गंगापूर रोड) असे संशयित नराधमाचे नाव आहे. एकाच इमारतीमध्ये राहत असल्याने ओळखीच्या असलेल्या संशयित भामरे याने चिमुरडीला कशाच्या तरी बहाण्याने स्वत:च्या घरी नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. सदरची बाब पीडित चिमुरडीने घरी आल्यानंतर सांगितल्यावर पोलिसात धाव घेत तक्रार दिली. संशयिताला अटक केली आहे.

# बालिका दिनानिमित्त महिला पोलीस व शिक्षिका यांचा सन्मान

### मुलींच्या सुरक्षेसाठी दामिनी सुरक्षा पथक सदैव तत्पर: पाटील

**वरुळ । प्रतिनिधी**

आर सी पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भोरखेडा ता शिरपूर जि धुळे येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने बालिका दिन हा महिला पोलीस व शिक्षिका यांचा सन्मान सोहळा व महिला सुरक्षा व सायबर क्राईम या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे पर्यवेक्षक सी जी




पाटील तर प्रमुख वक्ते शिरपूर पोलीस स्टेशन चे दामिनी सुरक्षा पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक छाया बी पाटील होते तर पोलीस महिला पौर्णिमा पाटील, रोशनी पाटील नुतन बाविस्कर, अनुराधा धाकड, तसेच महिला शिक्षिका मिना पटेल, रूपाली तिरमले, ऐश्र्वर्या मोरणकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते त्या सर्व महिलांचा विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.यावेळी पोलीस कॉन्स्टेबल प्रभाकर भिल उपस्थित होते.

पोलीस उपनिरीक्षक छाया पाटील यांनी मुलींच्या सुरक्षा व १८ वर्षातील विद्यार्थ्यांना सुरक्षा कायद्याच्या कक्षेत कोणत्या प्रकारची सुरक्षा पुरविली जाते याविषयी दामिनी सुरक्षा पथक सदैव तत्पर आहे यासाठी टोल फ्री नंबर ११२ वर आपण तक्रार दाखल करू शकतात त्यामुळे आपल्याला तात्काळ मदत प्राप्त होते.तसेच सायबर क्राईम विषयावर सविस्तरपणे मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी मोबाईल फोन चा वापर कसा करावा कोणती काळजी घ्यावी यासाठी पालकांना माहिती द्यावी अशी सूचना दिली,सुरक्षित रहा काळजी घ्या असे आवाहन केले.रुपाली तिरमले यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याविषयी सविस्तर माहिती दिली.

# वराकडे ना शिक्षण, शेती, घर न बघता लावला पदवीधर मुलीचा विवाह

### खरकार परिवाराच्या कौतुकास्पद उपक्रमाला कौतुकाची थाप

**चिमठाणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

प्रत्येक समाजात आज मुलगी मिळणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत कुठल्याही वधू पित्याला आपला जावई शोधण्यासाठी नोकरी बरोबर शेती तसेच उद्योग धंदा बघून मुलगी सुखी राहील. या गोष्टी



बघूनच मुलीच्या आई वडिलांचा आटापिटा असतो. मात्र शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथील बापु सदा पाटील यांची पदवीधर कन्या असून देखील त्यांनी मुलाकडे ना शेती ना घर ना नोकरी न बघता आपला भाचा कल्पेश बघून आपली मुलगी देखील भाच्याला दिल्याने खरकार परिवाराच्या उपक्रमाला वऱ्हाडींनी कौतुकाची थाप दिली आहे.

यावेळी वधू पिता बापू पाटील व आई यांचा भडणेतील लोकनियुक्त सरपंच गिरीश पाटील, आदर्श पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील युवराज माळी, माजी जि प सदस्य छोटू पाटील, भडणे दुध उत्पादक सोसायटीचे चेअरमन बाळू पाटील, रमेश पाटील निकम यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन वधु पित्याचा सत्कार करण्यात आला. मुलाचे कल्पेशचे आई व वडील दोघे लहानपणीच पितृछत्र हरपले असताना लहानपणापासून सुरत येथे वास्तव्यास होता व तिथेच कामधंदा करून स्वतः च्या पायावर जिद्द चिकाटी मेहनतीच्या बळावर आपल्या कर्तुत्वावर उभा राहिला. भडणे येथे मुलीच्या वडिलांनी म धुमधडाक्यात लग्न लावून दिल्याबद्दल लग्न सोहळा चर्चे चा विषय ठरला व लग्नप्रसंगी जमलेले नातेवाईक गावकरी ईस्ट मित्रांनी वधूवराना कौतुकाची दिली.

# शिरपूर भाजपा ओबीसी मोर्चा शहराध्यक्षपदी प्रकाश गुरव

**शिरपूर ।लक्ष महाराष्ट्र वृत्त**

भाजपा धुळे जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांनी शिरपूर भाजपा ओबीसी मोर्चा शहराध्यक्षपदी प्रकाश भिका गुरव रा. शिरपूर जि. धुळे यांची नियुक्ती केली आहे.

आ. काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भुपेशभाई पटेल, धुळे भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांचा हस्ते शिरपूर येथे प्रकाश गुरव यांना शिरपूर भाजपा



ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष नियुक्ती पत्र दिले. शिरपूर शहर भारतीय जनता पार्टीच्या ओबीसी मोर्चा शहराध्यक्षपदी मी आपली नियुक्ती करीत आहे. नियुक्ती पत्र देतेवेळी धुळे भाजपा जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, शिरपूर कृऊबा समिती सभापती के. डी. पाटील, पत्रकार सुभाष कुलकर्णी, माजी नगर सेवक सलिम खाटीक, पिपल्स बॅन्क संचालक संजय चौधरी, भाजपा शहर उपाध्यक्ष प्रशांत चौधरी आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळांचे शिक्षक हे गुणवंतच : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे प्रतिपादन

### जिल्हा परिषदेच्या शाळांना कॉम्पुटर, टीव्ही, टॅब वितरित

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

राज्य उत्पादन शुल्क विभाग, परनॉड रिकार्ड इंडिया व मुस्कान ड्रीम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने देवळा व दिंडोरी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ४२ शाळांना डिजिटल शिक्षणासाठी राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते आई कै. सुशिला सूर्यवंशी (सेवा निवृत्त मुख्याध्यापिका) व वडील कै.नामदेवराव सूर्यवंशी (सेवा निवृत्त गट विकास अधिकारी) यांच्या स्मृति प्रित्यर्थ जिल्हा परिषद येथील कार्यक्रमात कॉम्पुटर, टीव्ही, टॅब वितरित करण्यात आले. यावेळी



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, विभागीय उपायुक्त राज्य उत्पादन शुल्क विभाग एच.डी. तडवी, पोलिस अधीक्षक (उत्पादन शुल्क) शशिकांत गर्जे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. नितीन बच्छाव, परनॉड रिकार्ड इंडियाचे हेड प्रशांत त्रिपाठी, नाशिक प्लांट हेड सविंदर सिंग, मनोज पचोरी आदि उपस्थित होते.

आजच्या कार्यक्रमात उपस्थित असतांना माझा स्वतःचा जीवनपट डोळ्यांपुढे आला असून माझा देखील अशाच शालेय कार्यक्रमात तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला होता. तिथूनच भारतीय प्रशासकीय सेवेत येण्याची मला प्रेरणा मिळाली, जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक हे खाजगी शाळांच्या तुलनेत निश्र्चितच गुणवंत असतात, माझी दिवंगत आई सुशिला सूर्यवंशी ही जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापिका होती व वडील नामदेवराव सूर्यवंशी हे सेवा निवृत्त गट विकास अधिकारी होते. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांविषयी एक वेगळी आपुलकी मनामध्ये आहे. जिल्हा परिषदेचे शिक्षक हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम करतात यावेळी भौतिक सुविधांच्या विशेष अडचणी जाणवतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांना काळानुरूप शिक्षण देण्याच्या उद्देशाने आज सीएसआर निधीतून विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणासाठी साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. या सर्व साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांना भविष्यावेधी शिक्षण द्यावे असे प्रतिपादन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्व देत नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने मॉडेल स्कूल ही संकल्पना राबवण्यात येत आहे. डिजिटल शिक्षणातुन जागतिक ज्ञानाची दारे ही जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना उघडतील त्यासाठी संसाधनांचा सुयोग्य वापर हा जिल्हा परिषदेच्या शाळांनी करावा, असे मत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी व्यक्त केले.

आम्ही ज्या भागात काम करतो त्या भागाचा सर्वांगीण विकास व्हावा हा आमचा उद्देश असतो. राज्य उत्पादन शुल्क विभाग व नाशिक जिल्हा परिषद नाशिक यांच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यातील शाळांना मदत करता आल्याचा आम्हाला आनंद आहे असे परनॉड रिकार्ड इंडियाचे नाशिक प्लांट हेड सविंदर सिंह यांनी सांगितले.

# सावित्रीबाई फुले जयंती निमित्त एच.आर. पटेल विद्यालयात विविध कार्यक्रम

**शिरपूर। लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहरातील एच.आर.पटेल कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती निमित्त पोस्टर स्पर्धा, बेटी बचाव बेटी पढाव यावर नाटिका, स्त्री सक्षमीकरण या विषयावर नृत्य, तसेच 'मी सावित्री बोलतेय' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा 'राजगोपाल भंडारी हॉल' मध्ये घेण्यात आली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. एन.पवार तर प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक जे.पी. पाटील, श्रीमती एन. सी. पाटील, मनीषा पटेल होते. पोस्टर्स स्पर्धेत ८ वी ते १० वी च्या एकूण ७० विद्यार्थिनी तर वक्तृत्व स्पर्धेत १२ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रांजल अमोल सोनवणे ७ वी अ, उत्प्रेक्षा राजेंद्र सिसोदे ७ वी क, द्वितीय गौरी राहुल विखरणकर ५ वी अ, तृतीय गौतमी श्रावण पाटोळे ७ वी ड, उत्तेजनार्थ राधिका काशीराम पावरा ५ वी ड या विद्यार्थिनी विजयी ठरल्या. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी आर.आर.रघुवंशी, रासेयो विद्यार्थिनी उपस्थित होते. प्रास्ताविक श्रीमती एम.डी. पाकळे यांनी केले. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण व मनोगत अश्र्विनी पाटील, श्रीमती एस.ए.निकुम यांनी तर पोस्टर्स स्पर्धेचे परीक्षण कला शिक्षक बी.एस.मोरे यांनी केले.




# पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार

## धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघात कार्यक्रम




धुळे । धुळे

जिल्हा मराठी पत्रकार संघात पत्रकार दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर आ.फारुक शाह,अतिरिक्त पोलिस अधिक्षक किशोर काळे, निखिल सूर्यवंशी, योगेंद्र जुनागडे, बापू ठाकुर, दिलीप विभांडीक, धुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे, भाजपाच्या नेत्या जयश्री अहिरराव, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मिलिंद बैसाणे, रविंद्र इंगळे, सुनिल पाटील, नुरभाई पठाण, विशाल ठाकुर,तुषार बाफना, आप्पा खताळ, विजय अग्रवाल,धनश्री आणि प्रितम सूर्यवंशी  यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार अनिल चव्हाण, अमोल पाटील, निलेश भंडारी, गोपाल राजपुत, जीवन शेंडगे, गोपाल कापडणीस, देवेंद्र पाठक, अशोक तोटे, कमर शेख, भाऊसाहेब माळी, पुरुषोत्तम गरुड, अजिंक्य देवरे, आकाश सोनवणे, प्रकाश शिरसाठ, धनंजय गाळणकर,दीपक शिंदे, मधुकर मिस्तरी, चेतन पंडीत, गोरख गर्दे, रोहित गर्दे, सुभाष वाघ, मनोहर सोलंकी,आवेश पठाण, श्रीकृष्ण बेडसे, जमील शाह, मोहन मोरे, प्रदीप मिस्तरी,पुरुषोत्तम पाटील यांच्यासह उपस्थित पत्रकारांचा  मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन उपाध्यक्ष अतुल पाटील यांनी केले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# पत्रकार हा पोलिस दलासाठी अत्यंत महत्वाचा घटक : अपर पोलिस अधिक्षक काळे

## धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघात पोलिस पत्रकार संवाद कार्यक्रम संपन्न
















धुळे। पत्रकार

हा पोलिस दलासाठी अत्यंत महत्वाचा घटक आहे. पोलिस आणि पत्रकार या दोघांनाही समाज मान्यता आहे. त्यामुळे लेखणीच्या माध्यमातून कोणी दुखावले जाणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. म्हणूनच पत्रकारांनी लेखणीचा वापर सजगपणे करावा अशी अपेक्षा अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे यांनी व्यक्त केली. पत्रकार दिनानिमित्ताने धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार संघाच्या सभागृहात पोलिस पत्रकार संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून बोलताना अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे म्हणाले की, समाजामध्ये पत्रकार आणि पोलिस विशिष्ट ध्येयाने काम करीत असतात. एखादी घटना घडल्यावर त्यावर पोलिसांनी रिॲक्ट व्हावे ही जनतेची अपेक्षा असते. अशा परिस्थितीमध्ये घडलेल्या घटनेचा फिडबॅक देण्याचे महत्वाचे काम पत्रकार करीत असतात. पोलिस दलासाठी पत्रकार हा नाक-कान आणि डोळा अशी भुमीका निभावतो. अधिकारी म्हणून आम्ही दोन ते तीन वर्ष शहरात, जिल्ह्यात कार्यरत असतो. परंतु पत्रकार हे याच मातीचे असतात. ते साधारणपणे एकाच ठिकाणी काम करीत असतात. त्यामुळे त्यांची भूमिका आमच्यासाठी महत्वाची असते. आमची कृती चुक की बरोबर हे सांगण्याचे काम पत्रकार करतात. घडलेल्या घटनेचे समीक्षण पत्रकारांनी त्यांच्या पध्दतीने करावी ही अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

संकलन : दिपक वाघ